REGISTERED No. B 3134

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख २१ डिसेंबर, १९३८ | अंक ५०

सर्वांगीण प्रगति
सन १९३७ भक्कम भरभराटीचें वर्ष

## वेस्टर्न इंडिया
लाईफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड
सातारा शहर

१९३८ अखेर
आठवें मूल्यमापन
आणि
रौप्य महोत्सव

त्रैवार्षिक बोनस
हयातीनंतर रु. ७५ आणि हयातींतील रु. ६०
*कोणत्याही दृष्टीनें पहा*
वेस्टर्न इंडिया ठसठशीतपणें डोळ्यांत भरेल.
पुणें शाखा : : लक्ष्मी रोड, पुणें.

स्वतःचे मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या"चे योगेंच साधतां येते.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी
लिमिटेड, पुणें.

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.
ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजिंग एजंट.

## S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
## झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

## विविध माहिती

**लोकसंख्या**

सर्व जगांतली मिळून लोकसंख्या २०० कोटि आहे. त्यांतले ९० कोटि लोक कोणत्याना कोणत्या तरी धंद्यांत पोटासाठी काम करीत आहेत. ह्या ९० कोटींपैकी ५५ कोटि शेतावर काम करणारे लोक आहेत; आणि ह्या ५५ कोटींपैकी २७ कोटि एशिया खंडांत आहेत.

**नॅशनल प्लॅनिंग कमिटीची पहिली बैठक**

नॅशनल प्लॅनिंग कमिटीची पहिली बैठक गेल्या शनिवारीं झाली. तिचें उद्घाटन करतेवेळीं बाबू सुभाषचंद्र बोस ह्यांनीं भाषण केलें. मोठ्या प्रमाणावरील कारखान्यांच्या स्थापनेच्या प्रयत्नांमुळें खादीच्या उत्पादनावर अगर ग्रामोद्योगांवर प्रतिकूल परिणाम होईल अशी समजूत करून घेण्याचें कारण नाहीं असें त्यांनीं सांगितलें.

**ग्रेटब्रिटनमध्यें गेलेले प्रवासी**

ऑक्टोबर, १९३८ मध्यें इतर देशांतील १३,४८९ प्रवासी लोकांनीं ग्रेटब्रिटनला भेट दिली. त्याच महिन्यांत १०,६०२ परदेशी लोक कामानिमित्त ग्रेटब्रिटनमध्यें येऊन गेले, त्यांपैकी १,९८९ जर्मन होते.

**चांदीचें उत्पादन**

चांदीच्या एकूण जागतिक उत्पादनापैकीं शेकडा ८० इतकें उत्पादन अमेरिका खंडांत होतें.

**आयर्लंडची औद्योगिक प्रगति**

गेल्या पांच वर्षांत, उद्योगधंद्यांचे बाबतींत आयर्लंडनें अत्यंत शीघ्र गतीनें प्रगति केली आहे. १९३१ सालीं त्या देशांत एकूण ७२ कोटि रुपयांचें औद्योगिक उत्पादन झालें; १९३६ मध्यें हा आकडा १०५ कोटींवर गेला. कारखान्यांत काम करणारांची संख्या ह्या मुदतींत १ लक्ष, ११ हजारांची १ लक्ष, ५४ हजार झाली. आयर्लंडमधील बहुतेक सर्व कारखाने लहान आहेत. फक्त ३९ कारखान्यांतच प्रत्येकीं ५०० पेक्षा अधिक कामगार आहेत.

**ट्रेझरी बिलांवर २ रु. १ आ. ६ पै व्याजाचा दर**

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं १½ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. २ रु. १ आ. ६ पै इतका पडला.

**अमेरिकेंतील कपाशीचें पीक**

अमेरिकेंतील कपाशीचें चालू मोसमांतील उत्पादन १,२०,०८,००० गाठी होईल असा अमेरिकेच्या शेतकी खात्याचा अजमास आहे. दर एकरीं कपाशीचें प्रमाण २२६.६ पौंड पडेल अशी अपेक्षा आहे.

**फुटपाथकरितां ३¾ लक्ष रुपये**

मुंबई शहरांतील रस्त्यांस फुटपाथ करण्याकरितां म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या स्टँडिंग कमिटीनें ३¾ लक्ष रुपये मंजूर केले आहेत.

**प्रांतिक सरकारच्या कामगिरीचा आढावा**

गेल्या वर्षींतील दुसऱ्या सहामाहीमध्यें मुंबई सरकारनें बजावलेल्या कामगिरीसंबंधीं माहिती देणारें एक छोटें पुस्तक सरकारनें प्रसिद्ध केलें आहे, त्याचें मराठी, गुजराती, कानडी आणि उर्दू भाषांतर लवकरच बाहेर पडेल. एकूण ६५ हजार प्रती खेडोंपाडीं वांटण्यांत यावयाच्या आहेत.

**मध्यवर्ती असेंब्लीचें येतें अधिवेशन**

मध्यवर्ती असेंब्लीच्या येत्या अधिवेशनास ३ फेब्रुवारी, १९३९ रोजीं प्रारंभ होणार आहे.

**गव्हाची आयात**

१९३७-३८ मध्यें एकूण २० हजार टन गहूं ऑस्ट्रेलियांतून हिंदुस्थानांत आयात झाला. चालू वर्षाच्या २३ नोव्हेंबरपर्यंत ५७ हजार टन गव्हाची आयात झाली आहे.

**मोटारवरील कर भरण्याची शेवटची तारीख**

सन १९३९ च्या पहिल्या तिमाहीबाबत मोटार कर ३१ डिसेंबरच्या आंत भरला पाहिजे. ३१ डिसेंबर हा सुटीचा दिवस आहे, तेव्हां त्यापूर्वीं रकमेचा भरणा झाला पाहिजे.

**कपाशीचा शिलक सांठा**

१० नोव्हेंबर, १९३८ रोजीं हिंदुस्थानांतील व्यापारी, गिरण्या इत्यादींकडे मिळून कपाशीच्या ६,७०,४७५ गाठी शिलक होत्या. गेल्या वर्षीं त्याच तारखेचे सुमारास ५,४४,७६१ गाठी शिलक होत्या.

**कालव्याच्या पाण्याचे पाझरामुळें निरुपयोगी झालेली जमीन**

महाराष्ट्रांतील कालव्यांचे विभागांतील, गळतीच्या पाण्यामुळें लागवडीस निरुपयोगी बनलेली जमीन पुनः शेतीस उपयुक्त करण्यास सुमारें ६० लक्ष रुपये खर्च येईल असा अजमास आहे.

**सप्टेंबर महिन्यांतील औद्योगिक वांधे**

मुंबई प्रांतांत सप्टेंबर, १९३८ मध्यें एकूण १२ औद्योगिक वांधे झाले, त्यांत ८,२९५ कामगारांचे एकूण १,७५,२७१ कामाचे दिवस बुडाले.

**फ्रेंच मंत्रिमंडळावर विश्वास निदर्शक ठराव**

फ्रेंच विधिमंडळानें ३१५ विरुद्ध २४१ मतांनीं दलादिअर मंत्रिमंडळावरील आपला विश्वास प्रकट केला आहे.

**बिल्डिंग सोसायटीचा प्रचंड कारभार**

ग्रेट ब्रिटनमधील हॅलिफॅक्स बिल्डिंग सोसायटीनें आपल्या सभासदांस स्वतःसाठी घरें मिळविण्यास सहाय म्हणून १८५३ सालापासून आजपर्यंत सुमारें ३०० कोटि रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. दर आठवड्यास तिचे ४०० कर्जदार-सभासद आपली कर्जफेड पुरी करून गहाणघरें सोडवतात आणि घर-मालक बनतात. सोसायटीची जिंदगी सुमारें १६० कोटि रुपये असून तिच्या रिझर्व्ह खातीं ६½ कोटि रुपये आहेत. सोसायटीच्या ४०० शाखा आहेत.

**जागतिक खरेदींत अमेरिका आणि ग्रेटब्रिटन ह्यांचें महत्त्व**

सन १९३६ मधील जगांतील एकूण परराष्ट्रीय खरेदींपैकी दोन पंचमांशापेक्षा अधिक खरेदी अमेरिका, ग्रेटब्रिटन आणि ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देश ह्यांनीं केलेली आढळते. एकट्या अमेरिकेचा आणि ग्रेटब्रिटनचा मिळूनच हिस्सा एक तृतीयांशापेक्षा मोठा आहे.

**मेंढ्यांची संख्या**

सर्व जगांत मिळून एकूण ७२½ कोटि मेंढ्या आहेत, असा अजमास आहे.

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | किंमत रुपये |
|---|---|
| ४-१२-३८ ते १०-१२-३८ | १३,०५९ |
| ११-१२-३८ ते १७-१२-३८ | ४४७ |
| २१-९-३१ ते १७-१२-३८ | ३,१७,५१,३८,३३३ |

## अनुक्रमणिका


| पृष्ठ | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ६१८ | ६ बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. ... | ६२३ |
| २ हिंदुस्थानांतील बँकिंगचा धंदा ... | ६१९ | ७ विजेचें उत्पादन | ६२३ |
| ३ ताळेबंद कसा सजवतात! | ६२० | ८ हिंदी पोस्ट आणि तार खात्याचा अहवाल | ६२४ |
| ४ विमा एजंटाचा परवाना | ६२० | ९ हातमागाच्या शिक्षणाची सरकारी शाळा | ६२४ |
| ५ स्फुट विचार ... | ६२१ | १० कांहीं एक्सचेंज बँका | ६२५ |
| हुंडणावळीबाबत सरकारचा दुराग्रह–हिंदी कपाशीचें भवितव्य–मोठे कारखाने आणि खेडेगांवी उद्योगधंदे–वृत्त निवेदन संस्था–बँक ऑफ इंग्लंडसाठी सोन्याची खरेदी. | | ११ आयर्लंडची औद्योगिक प्रगति ... | ६२५ |
| | | १२ हिंदू पथिकाश्रम | ६२६ |
| | | १३ निवडक बाजारभाव | ६२७ |



# अर्थ

बुधवार, ता. २१ डिसेंबर, १९३८


## हिंदुस्थानांतील बँकिंगचा धंदा

" एखादे वेळीं मनाच्या खंबीरपणाचा तोल सुटून मी भलती गोष्ट करीत नाहीं, असें नाहीं; पण असला वेडेपणा मीं केला असल्याचें मला स्मरत नाहीं. " हिंदुस्थान सरकारचे मंत्री, सर नृपेंद्र सरकार, ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लीमध्यें हिंदी बँकिंगसंबंधांत स्वतंत्र कायदा करण्याविषयीच्या सूचनेस अनुलक्षून काढलेल्या वरील आशयाच्या उद्गारांचें रहस्य लक्षांत घेणें आवश्यक आहे. कंपनी कायद्याच्या दुरुस्तीचें बिल असेंब्लींत पास करून घेण्याचे बाबतींत त्यांनीं पुढाकार घेतला होता आणि नवीन बनलेल्या कंपनी कायद्यांत बँकिंगच्या धंद्याच्या नियंत्रणाविषयीं कित्येक कलमें घालण्यांत आलीं आहेत. ह्या धंद्यास बळकटी आणि स्थैर्य प्राप्त होण्यास त्या कलमांचा पुष्कळ उपयोग होण्यासारखा आहे. हिंदुस्थानांतील बँकिंगचें नियमन करण्यासाठी एक निराळा कायदा असावा असें मत अनेक वेळां व्यक्त करण्यांत आलें असून त्या धंद्यांत मधूनमधून गडबडी उपस्थित होतात, त्यांस आळा बसावा ह्या लोकांच्या स्वाभाविक इच्छेमुळें त्या मतास पुष्टी मिळत असते. तथापि, आधुनिक बँकिंगच्या व्यवहारांचें नियमन करण्याचा कायदा समाधानकारक रीतीनें बनवणें अत्यंत कठीण असल्याचें दिसून आल्यावरून दीर्घ विचाराअंतीं सरकारनें असल्या कायद्याचा विचार सोडून दिला. कंपनी कायद्यामध्येंच त्यासंबंधांत कांहीं कलमें घालून इच्छित कार्यभाग साधण्याचें त्यांनीं ठरवलें. असेंब्लींत प्रातीवरील कराबाबतच्या कायद्याच्या चर्चेची आरती करतांना तपशीलवार असा बँकिंगचा स्वतंत्र कायदा मध्यवर्ती विधिमंडळ लवकरच पसार करून आपल्या भरीव कामगिरींत भर टाकील अशी आशा श्री.सत्यमूर्तींनीं प्रकट केली होती. त्यानंतर केलेल्या आपल्या भाषणांत सर नृपेंद्र सरकार ह्यांनीं विनोदानें वर नमूद केलेले उद्गार काढून बँकिंगबद्दलच्या कायद्याविषयीं अभिवचन देण्याचा वेडेपणा केल्याचें आपणास स्मरत नाहीं असें सांगितलें. एका बाजूनें लोकांस वाटत असलेली बँकिंगच्या कायदेशीर नियमनाची आवश्यकता आणि दुसऱ्या बाजूनें, सुटसुटीत, व्यावहारिक व उपयुक्त कायदा करून बँकिंगच्या व्यवहारांचें नियंत्रण करण्याची कठीणता ह्या दोन गोष्टी येथें स्पष्ट प्रतीत होतात. व्यवहारांतला चोखपणा आणि निर्भीडपणा आणि जनतेचा विश्वास ह्या गोष्टींवर बँकांची यशस्विता मुख्यत्वेंकरून अवलंबून असते. कायद्याचीं कितीहि नियंत्रणें असलीं तरी चालकांची लायकी आणि त्यांनीं करावयाच्या व्यवहारांची सुरक्षितता ह्यांचे बाबतींत नियमांचा उपयोग क्वचितच होऊं शकतो. ह्या कारणानें बँकिंगच्या धंद्याचे बाबतींत विशिष्ट मर्यादेपुढें कायदा जाऊं शकत नाहीं. धंद्यांत कारभाराचें स्वातंत्र्य किती असावें आणि त्याचें नियंत्रण कसें व कोठें करावें हें निश्चित करणें अवघड आहे. सर नृपेंद्र सरकार ह्यांच्या म्हणण्याचा मतितार्थ हाच आहे.

मुंबईच्या रोटरी क्लबांत मि. हेडन ह्यांनीं 'हिंदी बँकिंगच्या पुढचे प्रश्न' ह्या विषयावर नुकतेंच व्याख्यान दिलें. त्यांतील मुद्यांकडे येथें लक्ष वेधणें उद्बोधक होईल. "हिंदुस्थानांत बँकिंगच्या सोयी भरपूर आहेत. व्यापारी व सहकारी बँका, सराफ व सावकार ह्यांच्याकडून कर्जें मिळण्याची व्यवस्था येथें वाटेल तेवढी विस्तृत आहे. कर्जाऊ पैसा देण्याच्या सोयी हिंदुस्थानांत आहेत तितक्या दुसऱ्या कोणत्याहि देशांत नाहींत" असें त्यांचें म्हणणें आहे. आधुनिक पद्धतीच्या हिंदी बँकांच्या मार्गांतल्या अडचणी त्यांच्या दृष्टीनें ( १ ) इंपीरियल आणि एक्सचेंज बँकांनीं अगोदरच प्राप्त करून घेतलेलें प्राधान्य, ( २ ) पाश्चात्य पद्धतीची माहिती असलेल्या व्यवस्थापकांचा तुटवडा,( ३ ) ह्या पद्धतीची मूलतत्त्वें समजणाऱ्या डायरेक्टरांचा अभाव आणि ( ४ ) बँकांचें स्वतःचें अत्यंत मर्यादित भांडवल ह्या आहेत. स्वतःच्या मालकीचें भांडवल अपुरें असल्यामुळें चढीच्या दरानें व्याज देऊन ठेवी स्वीकारण्याचा प्रसंग लहान बँकांवर येतो आणि त्याचबरोबर भारी व्याजानें, पक्कीं सुरक्षित नाहींत अशीं कर्जें त्यांस द्यावीं लागतात. नवीन कंपनी कायद्यानें अर्धा लाख रुपये भरलेलें भांडवल असेल तरच नवी बँक काढण्यास परवानगी दिली आहे. पण रिझर्व्ह बँकेच्या छत्राखाली येण्यास मात्र पांच लक्षांचें भांडवल बँकेपाशी असावें लागतें, अशी विलक्षण परिस्थिति निर्माण झाली असल्याचें मि. हेडन ह्यांनीं सांगितलें. निदान दहा लक्ष रुपयांचें भांडवल १९४५ सालापूर्वी जिच्या मालकीचें असणार नाहीं त्या बँकेला व्यवहार करण्यास परवानगी मिळूं नये अशी त्यांनीं सूचना केली आहे. पण ही अट पुरी करणाऱ्या सर्वच बँका सुरक्षित रहातील ही त्यांची कल्पना अनुभवास धरून नाहीं. बँकांजवळ स्वतःचें पुरेसें भांडवल असणें आवश्यक आहे; त्यामुळें त्यांचा पाया मजबूत होतो हा त्यांचा मुद्दा मान्य होण्यासारखा आहे. परंतु ह्या भांडवलाची मर्यादा निश्चित करणें सोपें नाहीं. भांडवलाच्या मोठ्या रकमेची अट कायद्यानें घातल्यास हिंदुस्थानच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितींत बँकिंगच्या विस्तारास अडथळा झाल्यावांचून रहाणार नाहीं. भरपूर भांडवल असलें म्हणजे बँक चांगली चालेलच अशी शाश्वती तरी कोठें आहे? बेतांचें भांडवल असूनहि जबाबदारीच्या भावनेनें आणि काळजीनें चालवली जाणारी लहान बँकहि सुरक्षित व यशस्वी होऊं शकेल आणि चांगल्या यशस्वी बँकेस वाटतें भांडवल मिळण्यास अडचण पडणार नाहीं. तसेंच, बँकेचें स्वतःचें भांडवल आणि तिच्या व्यवहाराचा व्याप ह्यांमध्यें योग्य प्रमाणबद्धता असली पाहिजे ह्यांत शंका नाहीं.

तिच्या अभावीं, तुटपुंज्या भांडवलामुळें बँकेच्या व्यवस्थेंत जबाबदारपणा रहात नाहीं. दिल्या जाणाऱ्या कर्जांची सुरक्षितता आणि व्यवस्थेच्या खर्चांचें योग्य प्रमाण हाच बँकांच्या यशस्वीपणाचा खरा पाया आहे. "दुसऱ्याच्या पैशावर फायदा मिळवणारा धंदेवाला" ही "बँकर"ची मनोरंजक व्याख्या अर्थपूर्ण परंतु गैरसमज उत्पन्न करणारी आहे. सूक्ष्म रीतीनें विचार करणारास तीमध्यें पुष्कळ तथ्य आढळेल. परंतु, "हातांत नाहीं अडका, आणि बाजाराला देतो धडका" असा बँकरचा प्रकार तिच्यावरून समजावयाचा नाहीं. ज्यांचें स्वतःचें भांडवल आणि गंगाजळ्या भरपूर आहेत अशा बँकाच शेवटीं टिकतात आणि त्याच जनतेच्या हिताच्या दृष्टीनें इष्ट आहेत. मर्यादित आकाराच्या व नवीन बँकांनीं त्यांचें ध्येय पुढें ठेवून स्वतःच्या मालकीचें भांडवल आणि रिझर्व्हस हीं वाढवलीं पाहिजेत आणि जबाबदारीच्या वृत्तीनें आणि काळजीकाट्यानें व्यवहार चालविले पाहिजेत. हा बोध वरील विवेचनावरून काढणें उचित होईल. मोठ्या भांडवलाच्या आणि श्रीमान लोकांच्या बँकांस मक्तेदार बनवण्याची मि. हेडन ह्यांची सूचना अग्राह्य आहे. पण तिच्यामध्यें असलेलें महत्त्वाचें गर्भित तत्त्व मात्र लक्षांत बाळगण्यासारखें आहे. बँकांचे संस्थापक व चालक आणि जनता ह्यांनीं त्यांच्या भाषणांतील वर दिलेल्या मुख्य मुद्यांचा चांगला विचार करणें आवश्यक आहे. देशाच्या आर्थिक उदयाच्या काळांत ह्या संबंधांत काळजी घ्यावी तेवढी थोडी आहे.

---

## ताळेबंद कसा सजवतात ?

एखाद्या व्यवहाराची खरी परिस्थिति समजण्यासाठी त्याच्या ताळेबंदाची छाननी करण्याची पद्धति आहे. तथापि ताळेबंद हा नेहमी वस्तुस्थितिनिदर्शक नसतो आणि कित्येक प्रसंगीं आकड्यांची मखलाशी केली जाऊन लोकांची दिशाभूल होते. ह्या बाबत सावधगिरी बाळगली पाहिजे. खालील माहिती देण्याचा उद्देश कावेबाज लोकांच्या लबाडीच्या व्यवहारांवर उजेड पाडणें हा असून लोकांनीं ताळेबंदाची छाननी करतांना कोणत्या बाबींची छाननी नीट केली पाहिजे, तें त्यावरून समजून येईल. ऑडिटरनें आपलें तपासणीचें काम ताळेबंद तयार झाल्यानंतर करावयाचें असल्यानें कांहीं बाबतींत त्यास कंपन्यांच्या अधिकाऱ्यांवर विश्वास ठेवणें अपरिहार्य असतें. विश्वासार्ह डायरेक्टर कंपन्यांच्या कारभाराचे सूत्रधार असणें कसें आवश्यक असतें हें त्यावरून स्पष्ट होईल.

### नफा-तोटा-पत्रक

खरेदीच्या बाबी कित्येक वेळां दडवलेल्या असतात. वर्ष अखेरीच्या आधीच्या दोन-चार आठवड्यांतील खरेदी दर्शविणारे कागद ऑडिटरचे नजरेस आणण्यांत येत नाहींत. व्यवहार किफायतशीर होईपर्यंत ह्या मार्गाचा अवलंब केला जातो. कांहीं खोट्या खातेदारांचे नांवें विक्रीबाबत बाकी काढून नफा वाढवून दाखविण्यांत येतो. पुढें केव्हां तरी बराच मोठा नफा झाला, म्हणजे ही खोटी बाकी लिहून टाकली जाते. घसाऱ्यासाठी दरसाल कांहीं रकम लिहून टाकावी लागते. तथापि झीज कमी होत असल्याचें दाखवून नफ्याचें प्रमाण वाढविण्याची पद्धत अनिष्ट आहे. विशेषतः ज्या ठिकाणीं मॅनेजिंग डायरेक्टरांचें कमिशन निवळ नफ्यावर अवलंबून ठेवलेलें असतें, त्या ठिकाणीं नफा फुगविण्याकरितां घसारा अपुरा काढून ठेवण्याची प्रवृत्ति होण्याचा संभव असतो. कोणत्या दरानें हा घसारा बाजूस काढण्यांत यावा हें ऑडिटरांसहि प्रत्येक वेळीं सांगतां येत नाहीं, कारण प्रत्येक धंद्याची माहिती त्यांस असणें अशक्य आहे. सहाजिकच, मॅनेजिंग डायरेक्टर अगर कंपनीचे इतर जबाबदार अधिकारी ह्यांचेवर त्यास थोडा-फार तरी विश्वास टाकावा लागतो. शिल्लक मालाची किंमत फुगविल्यानेंहि ताळेबंद उठून दिसण्यास सहाय होतें. कंपनीच्या जबाबदार अधिकाऱ्यांकडून मालाबाबत मिळालेलें सर्टीफिकेट ग्राह्य धरून ऑडिटर चालत असतो. अर्थात् ह्या पद्धतीनें ताळेबंद कायम सजवीत रहाणें शक्यच नसतें. चालू खर्चाच्या कित्येक बाबी भांडवली स्वरूपाच्या समजून आणि तो खर्च ताळेबंदांत जिंदगीखातीं घालून खर्च कमी दाखवून नफा वाढवून दाखवितां येतो. असें करणें म्हणजे भांडवलांतूनच डिव्हिडंड देण्यासारखें आहे.

### गुप्त रिझर्व्ह

गुप्त रिझर्व्ह राखणें हें अत्यंत सावधगिरीचें चिन्ह आहे. कित्येक वेळां जिंदगीची किंमत लोकांपासून दडविण्यासाठी ह्या रिझर्व्हजचा अवलंब केला जातो. जिंदगीची किंमत उतरलेली दाखवून आणि वेळप्रसंगीं जिंदगीपैकी कांहीं भाग विकून टाकून ही गफलत लपवितां येते आणि चोख व्यवहार न करणारे डायरेक्टर त्यापासून स्वहित साधूं शकतात.

### बँकेंतील शिलका

मोठ्या कंपन्यांच्या बँकांतील खात्यांवर मोठमोठ्या रकमा असतात. कित्येक वेळां डायरेक्टर त्यांपैकीं कांहीं रकम स्वतःच्या खासगी कामासाठी काढून घेतात आणि तेवढेंच कर्ज कोणाच्या तरी नांवें येणें दाखवितात. याहिपुढें जाऊन, सदरहु कर्जावरील येणें व्याज नफा-तोटा पत्रकांत जमेस धरून नफा फुगवतां येतो. अर्थात, पुढें केव्हां तरी बुडीत कर्ज म्हणून सबंध रकम लिहून टाकावीच लागते.

---

## विमा एजंटाचा परवाना

( नवीन विमा कायद्याखालील नियमांच्या मसुद्यांतून खालील नियम उद्धृत केले आहेत. )

विमा एजंटाचा परवाना पाहिजे असणारानें खालील गोष्टी कराव्या:—

( अ ) रिझर्व्ह बँकेंत; अगर ज्या ठिकाणीं रिझर्व्ह बँकेची शाखा नसेल तेथें इंपीरिअल बँकेंत अथवा कोणत्याहि सरकारी तिजोरींत प्रत्येक एजंटानें आपली लायसेन्सची फी भरावी, आणि त्याबाबत पावती घ्यावी. वार्षिक फी एक रुपया आहे.

( ब ) ब्रिटिश हद्दीमधील एजंटानें परवान्याच्या अर्जाचा नमुना जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या रजिस्ट्रारकडून घ्यावा आणि ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर रहाणारानें सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सकडून अर्ज मागवावा.

( क ) हा अर्ज भरून आणि परवान्याच्या फीची पावती त्यास जोडून तीं दोन्हीं उपरिनिर्दिष्ट रजिस्ट्रार अगर सुपरिंटेंडेंटकडे पाठवावीं. अर्जाची छाननी झाल्यावर अर्जदारास लायसेन्स मिळेल.

( ड ) विमा एजंटाचा परवाना सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें विमा कायद्याच्या ४२ व्या कलमांतील ५ व्या पोटकलमानुसार रद्द केल्यास, ही गोष्ट त्यानें सर्व प्रांतांतील जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या रजिस्ट्रारांस कळवावी आणि एजंटाकडून लायसेन्स परत मागवावा. ज्या प्रांतांत एजंटास परवाना दिलेला असेल, त्या प्रांतांतील एका इंग्रजी आणि एका स्थानिक भाषेंतील वृत्तपत्रांत एजंटाचा परवाना रद्द केल्याची गोष्ट जाहीर करण्यांत यावी. सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें परवाना दिलेला असल्यास, त्यास योग्य वाटेल त्या वृत्तपत्रांतून परवाना रद्द केल्याचें जाहीर करण्यांत यावें.

---

# स्फुट विचार

### हुंडणावळीबाबत सरकारचा दुराग्रह

हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय हुंडणावळीच्या दरांत अनुकूल फरक करण्याविषयींच्या प्रश्नास राष्ट्रीय सभेनें पुन्हां चालना दिल्याबरोबर हिंदुस्थान सरकारनें एक पत्रक प्रसिद्ध करून सध्याच्या धोरणापासून आपण यत्किंचितहि ढळणार नाहीं अशी घोषणा तात्काळ केली आहे. हुंडणावळीचा सध्याचा १८ पेन्सांचा दर कमी करणें सर्वसाधारणपणानें राष्ट्राच्या आणि विशेषतः शेतकरीवर्गाच्या अहितार्चे असल्यानें ती गोष्ट करण्यास आपण तयार नाहा असें त्यांनीं ठांसून सांगितलें आहे. हुंडणावळ उतरली असतां शेतकऱ्यांच्या मालास येणारी किंमत म्हणण्यासारखा चढणार नाहीं, पण त्यांस जो माल विकत घ्यावा लागतो, त्याची किंमत चढून बहुसंख्य जनतेचा तोटा मात्र होईल अशी सरकारची विचारसरणी आहे. जागतिक मंदीमुळें हिंदी कच्च्या मालास बेताची मागणी परदेशांत असल्यामुळें १३½ रुपयांच्या ऐवजीं १५ रुपयांचा पौंड झाल्यानें हिंदी मालास "म्हणण्यासारखी" अधिक किंमत येणार नाहीं, ह्या सरकारच्या विधानावरून "कांहींतरी अधिक" किंमत त्यास येईल ही त्यांची कबुली स्पष्ट होत आहे. ज्या कारणामुळें हिंदी मालास अधिक भाव येणार नाहीं, त्याच कारणामुळें शेतकऱ्यास मालाच्या याव्या लागणाऱ्या किंमतीहि वाढणार नाहींत हें अनुमान सरळच निघत नाहीं काय? शिवाय, हिंदी शेतकरी असा कोणता आणि कितीसा परदेशी माल वापरतात कीं तो महाग होण्याची भीति आमच्या दरिद्री जनतेस वाटावी? हिंदुस्थानांतले पैसेवाले आणि सामान्य लोक, भांडवलवाले आणि कामकरी ह्यांच्या हितांत परस्पर-विरोध असल्याचें हिंदुस्थान सरकार दाखवीत आहे, त्याविषयीं लोकांनीं सावधगिरीनें विचार करणें अगत्याचें आहे. शेतकरीवर्गाचा फायदा होत असतां इतर लोकांचें थोडेसें नुकसान झालें तरी तें त्यांनीं व्यापक राष्ट्रीय दृष्टीनें घटकाभर सोसलें पाहिजे. तसेंच, हुंडणावळीचा दर उतरल्यामुळें परदेशी माल महाग होऊन स्वदेशी भांडवलवाले आणि त्यांचे धंदे ह्यांस फायदा झाला तर त्यांत बिघडलें कोठें? हुंडणावळीचा १८ पेन्सांचा दर कायम ठेवण्याचा सरकारचा अट्टाहास चालला आहे तो, मध्यवर्ती राज्यकारभारांत हिंदी लोकांस सत्ता नसल्याचा परिणाम आहे. ह्या देशाच्या एकंदर हिताच्या दृष्टीनें हुंडणावळीचा दर कोणता असावा हें लोकांनीं कां ठरवूं नये? या बाबतींत लोकप्रतिनिधींच्या आणि त्यांच्या तज्ज्ञ सल्लागारांच्या मतास मान कां मिळूं नये आणि त्या बाबतींत सरकारनें आपलेच घोडे कां दामटीत रहावें?

---

### हिंदी कपाशीचें भवितव्य.

ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनच्या वार्षिक सभेचे वेळीं तिचे अध्यक्ष, सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास, ह्यांनीं आपल्या भाषणांत हिंदी कपाशीच्या भवितव्यासंबंधीं चर्चा केली. ३१ ऑगस्ट, १९३८ अखेर संपलेला मोसम अत्यंत वाईट कसा गेला, हें त्यांनीं तपशीलवार आकडे देऊन सांगितलें. चालू मोसमाचे आरंभीं हिंदुस्थानांत २२½ लक्ष गांठी पडून आहेत, म्हणजे सहा महिन्यांच्या उठावास पुरेल इतक्या कपाशीचा सांठा आज शिल्लक आहे. अमेरिकेंत १ कोटि, ३० लक्ष गांठी शिल्लक आहेत, म्हणजे एक वर्षभर सबंद जगास पुरेल एवढी अमेरिकन कपास आज सांठवणींत आहे. मागणीस अनुसरून पुरवठा मर्यादित कसा करावयाचा हा प्रश्न अमेरिकन सरकारापुढें उभा आहे आणि हिंदुस्थानांतहि तशीच कठीण परिस्थिति आहे. वाढत्या लोकसंख्येस प्लेग, देवी, इत्यादि सार्थीमुळें नैसर्गिक आळा बसतो, तशीच प्रकारें कपाशीचें पीक मर्यादित झाल्याविना तरणोपाय नाहीं, असे निर्वाणीचे उद्गार सर पुरुषोत्तमदास ह्यांनीं काढले, त चिंतनीय आहेत. कपास पेरणाऱ्या हिंदी शेतकऱ्यास सहाय करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें कोणतीहि योजना हातीं घेतलेली नाहीं आणि कपाशीच्या वहातुकीचे दर उतरविण्यास त्यानें नकार दिलेला आहे. हिंदुस्थानांतून बाहेर देशांकडे जाणाऱ्या कपाशीस अत्यंत भारी दरानें आगबोटीच्या वहातुकीचा खर्च सोसावा लागतो. आगबोटींच्या वहातुकीसाठीं हिंदुस्थानास परकीयांचे तोंडाकडे जोवर बघावें लागणार तोंपर्यंत हिंदी निर्गतीची अशीच गळचेपी होत राहणार, ही गोष्ट सरकारचे नजरेस आलेली नाहीं, असें नाहीं. कपाशीच्या लागवडीस उत्तेजन न देण्याचें आणि कपास पेरूं नका असा प्रचार करण्याचें प्रांतिक सरकारांनीं धोरण स्वीकारलें तरी तें फलदायी झालेलें नाहीं. कपाशीच्या ऐवजीं दुसरें कोणतें पीक काढलें असतां शेतकऱ्यांस नफा होईल, हें कोणीच सांगूं शकत नाहीं. शेतीच्या धंद्यांत कोठेंच किफायत उरलेली नसल्यास, केवळ पीकपालट केल्यानें विशेष उपयोग होणार नाहीं. वर म्हटल्याप्रमाणें कपाशीच्या उत्पादनाचें नैसर्गिक कारणांमुळें नियंत्रण होणें हाच तरणोपाय दिसतो हें दुर्दैव आहे. अर्थात्, सरकारी प्रयत्नांनीं आणि जनतेच्या सहकार्यानें दुःस्थिति जेवढी दूर करतां येईल, तेवढी करण्याची खटपट अवश्य झाली पाहिजे.

---

### मोठे कारखाने आणि खेडेगांवी उद्योगधंदे

खादी आणि ग्रामोद्योग ह्यांकडे लक्ष पुरविण्यासाठीं स्वतंत्र मंत्री नेमण्याची सूचना म. गांधी ह्यांनीं प्रांतिक प्रधान मंडळांस केली आहे. जुने ग्रामोद्योग ऊर्जितावस्थेस आणण्याचें आणि नवीन खेडेगांवी धंद्यांस प्रारंभ करण्याचें महत्त्व आतां सर्वांस पटलेलें असून प्रांतिक सरकारांप्रमाणें हिंदुस्थान सरकारनेंहि त्याबाबत थोडेफार यत्न चालविलेले आहेत. खेडेगांवी उद्योगधंद्यांची वाढ झाल्याविना शेतकऱ्यांची रहाणी सुधारणें अशक्य आहे, ह्याविषयीं आतां शंका उरलेली नाहीं. मुंबईच्या प्रधानमंडळांतील फडनवीसांकडे शेती, सहकार, ग्रामोद्योग इत्यादि खातीं सोंपवून त्या सरकारनें खेडेगांवी उद्योगधंद्यांच्या आणि खेडेगांवी जनतेच्याबाबत आपली कर्तव्यदक्षता आणि जागरूकता स्पष्ट केली आहे आणि ग्रामोद्योगाचे चळवळीस जोरानें चालना मिळेल असा यत्न चालविला आहे. अशा कामासाठीं एका स्वतंत्र मंत्र्याची नेमणूक व्हावी, असा गांधीजींचा आग्रह आहे, त्याचे मुळाशीं ह्या प्रश्नाचें महत्व पटविण्याची त्यांची मनःपूर्वक इच्छाच असावी. इकडे ग्रामोद्योगाचें महत्व म. गांधी पटवून देत असतांनाच, कॉंग्रेसच्या प्लॅनिंग कमिटीचें उद्योगीकरणाचें कार्य चालूं झालें आहे. ह्या दोन्ही धोरणांत विरोध नाहीं, हें श्री. सुभाषचंद्र बोस ह्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे. मोठ्या प्रमाणावरील कारखाने आणि लहान प्रमाणावरील खेडेगांवी धंदे ह्या दोहोंसहि हिंदुस्थानांत विपुल वाव आहे, इतकेंच नव्हे तर त्यांची आवश्यकता आहे. म. गांधी खेडेगांवी उद्योगधंद्यावर भर देऊन त्यांचें महत्त्व वर्णीत आहेत आणि प्लॅनिंग कमिटी प्रचंड कारखान्यांची

योजना आखण्यांत गुंतलेली आहे. काँग्रेसच्या धोरणाचीं हीं दुहेरीं अंगें हिंदुस्थानच्या परिस्थितीचीं निदर्शक आहेत. प्रांतिक सरकारांनीं ह्या दोन्ही मार्गांचा अवलंब केल्यास आर्थिक प्रगतीचें पाऊल जोरानें पुढें पडण्यास अतिशय सहाय होईल.

### वृत्त-निवेदन संस्था, पुणें

इंग्रजी व देशी भाषांतील नियतकालिकांच्या वाढत्या संख्येमुळें पुढारी, संस्था, कार्यकर्ते इत्यादींना या अफाट वृत्तपत्रीय सागरांतून त्यांचेसंबंधीं किंवा त्यांच्या अभ्यासाचे विषयांसंबंधीं येणाऱ्या विविध स्वरूपाच्या मजकुरावर नजर ठेवून त्याचा उपयोग करून घेणें अशक्य झालें आहे. ही अडचण दूर करण्याचें काम प्रस्तुत वृत्त-निवेदन संस्था करीत असून नियतकालिकें आणि टळक व्यक्ती यांचेमधील एका आवश्यक साखळीची कामगिरी ती बजावीत आहे. इंग्रजी, मराठी, गुजराथी, हिंदी इत्यादि भाषांतील लहान-मोठ्या शेकडो नियतकालिकांचें मंथन आपले वर्गणीदारांचे हिताचे दृष्टीनें ही संस्था करीत आहे. या पत्रांतून वर्गणीदार संस्था अगर व्यक्ती यांचेसंबंधीं येणाऱ्या सर्व प्रकारच्या निवडून काढलेल्या मजकुरांची (भाषणें, लेख, हालचाली, कार्य, संपादकीय टीका, किरकोळ स्फुट निर्देश इ.) कात्रणें ताबडतोब त्यांचेकडे रवाना करण्याची व्यवस्था संस्था करीत असून, जरूर तर रोजच्या रोजहि मजकूर रवाना केला जातो. अभ्यासू लोकांसहि त्यांच्या आवडीच्या विषयाचीं कात्रणें वक्तशीर मिळण्याची सोय संस्थेमार्फत होते. कित्येक वर्षें वृत्तपत्र व्यवसायांत असलेले आणि कांहीं वर्षें एका मराठी दैनिकाच्या संपादकाचें काम केलेले श्री. ना. तु. ठाकूर हे ह्या संस्थेचे चालक आहेत. संस्थेचा पहिला वार्षिक समारंभ नुकताच श्री. दादासाहेब मावळणकर ह्यांचे अध्यक्षत्वाखाली झाला, त्यावेळीं पुण्यांतील संस्थेचे अनेक वर्गणीदार आणि हितचिंतक पानसुपारीस आले होते. कोल्हापूरचे महाराज, सांगलीचे राजेसाहेब, जमखंडीचे राजेसाहेब, ना. श्री. खेर, ना. श्री. पाटील, बडोद्याच्या उद्योगखात्याचे प्रमुख श्री. मेहता, रावराणी लक्ष्मीबाई राजवाडे, ह्यांनीं संस्थेस संदेश पाठविले होते. संस्थेचें इंग्रजी नांव "पर्सनल प्रेस सर्व्हिस" असें असून, तिचा पत्ता ४८१, शनिवार, पुणें २ असा आहे.

### बँक ऑफ इंग्लंडसाठी हिंदुस्थानांत सोन्याची खरेदी !

युरोपांत आणि अमेरिकेंत सोन्यास मागणी असतांनाहि हिंदी सोन्याची निर्गत मंदावली आहे; तथापि, हिंदी रिझर्व्ह बँकेच्या हवालीं सोनें करण्याच्या प्रवृत्तीस गेल्या महिन्यापासून प्रारंभ झाला आहे. इंग्लंडमध्यें पैसे उपलब्ध करून देण्यासाठीं, हिंदुस्थानांत सोनें खरेदी करून तेवढेंच सोनें लंडनमधील आपल्या शाखेमार्फत विकण्याचा बँकेचा उद्देश असावा, असा लोकांचा प्रथम ग्रह झाला. बँकेजवळील लंडन आणि हिंदुस्थान येथील सोन्याच्या साठ्यांत ज्या अर्थी फरक झालेला आढळून येत नाहीं त्या अर्थी वरील विचारसरणी चुकीची आहे, हें स्पष्ट होतें. बँक ऑफ इंग्लंडच्यातर्फे, तिचा एजंट म्हणून, रिझर्व्ह बँक हिंदुस्थानांत सोनें खरेदी करून साठवीत असावी असा "एकॉनॉमिस्ट" ह्या ब्रिटिश साप्ताहिकाचा अजमास आहे.

### कॉमनवेल्थ कंपनीनें मिळविलेलें काम

ता. ७ डिसेंबरच्या "अर्था"च्या अंकांत पृ. ५९७ वर तिसऱ्या स्फुट विचारांत "कॉमनवेल्थ कंपनीचें तृतीय मूल्यमापन" ह्या शीर्षकाखालील मजकुरांत "पहिल्या वर्षी कंपनीनें १ लक्ष रुपयांचें काम पुरें केलें"असें छापलेलें आहे."१ लक्ष रुपयांचें' ह्या ऐवजी "७ लक्ष रुपयांचें" असा मजकूर त्या जागीं पाहिजे.

### पेट्रोल पट्टीवरील आक्षेप

मध्यप्रांतानें योजिलेला पेट्रोलच्या विक्रीवरील कर कायदेशीर आहे, असा फेडरल कोर्टानें निर्णय दिलेला आहे. तथापि, इतर कारणांकरितां हा कर न बसविणें न्याय्य आणि इष्ट आहे, असें इंडियन रोड्स ॲन्ड ट्रॅन्स्पोर्ट डेव्हलपमेंट असोसिएशनचें म्हणणें आहे, आणि तें त्यानें मध्यप्रांत सरकारास मागेंच कळविलें होतें. विशेषतः खालील मुद्यांवर असोसिएशननें भर दिला होता:--

(१) पेट्रोलवर सध्या अगोदरच दर गॅलनमागें दहा आणे एक्साइज पट्टी आहे. म्हणजे मध्यप्रांतांतील पेट्रोलच्या किरकोळ विक्रीच्या किंमतीपैकी शेकडा ५० इतकी रकम ही पट्टीच खाऊन जाते. तेव्हां पेट्रोलवर पुनः आणखी पट्टी बसविणें योग्य होणार नाहीं.

(२) मोटार वहानांवर मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकारें आणि म्युनिसिपालिट्या हीं कर बसवितात. मध्यवर्ती सरकार आयात होणाऱ्या मोटारींवर त्यांच्या किंमतीच्या मानानें शेकडा ३७½ इतका कर घेते. प्रांतिक सरकारें प्रत्येक वहानावर कर बसवितात आणि म्युनिसिपालिट्या व्हील टॅक्स घेतात. ह्या तीन्ही करांमध्यें एकसूत्रता आणण्याचा प्रयत्न कोणीच करीत नाहीं. मध्यप्रांतामध्यें, २½ वर्षांचे अवधींत प्रत्येक मोटार बस आपल्या किंमतीपेक्षा अधिक रकम कर म्हणून भरते.

(३) हिंदुस्थानासारख्या लांब अंतरांच्या देशांत मोटार वहातुकीचें महत्त्व विशेष आहे. मोटार वहातुक महाग झाल्यास शेतकऱ्यांच्या मालास योग्य किंमत मिळणें कठीण होईल आणि इतर मार्गांनींहि त्यांचें नुकसान होईल.

(४) जेथें पेट्रोलवरील पट्टी अंमलांत नाहीं, तेथून पेट्रोल आणविण्याचा यत्न लोक करतील आणि त्यांस प्रतिबंध करण्यासाठी सरकारास बराच खर्च पडेल.

### पुणें औद्योगिक प्रदर्शन, १९३९

लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें या संस्थेनें पुणें शहराच्या रहिवाशांच्या वर्णानुक्रमें व घरनंबराच्या क्रमानें दोन मोठाल्या डायरेक्टरी तयार करून माहिती-विभागांत ठेविल्या आहेत. हे कोश मतदारांच्या पुणें शहर म्युनिसिपॅलिटीनें केलेल्या याद्या एकत्र करून तयार केले आहेत.

पुणें शहरच्या उद्योगधंद्यांस मदत म्हणून पुणें औद्योगिक प्रदर्शनाच्या पाकिटांवर जाहिरातीसाठीं जागा कोणताहि आकार न घेतां सर्वस्वी उपकारबुद्धीनें देणें आहे. तरी ज्या धंदेवाल्यांस याचा फायदा घेणें असेल त्यांनीं मे. अध्यक्ष, पुणें शहर म्युनिसिपालिटी, ट्रस्टी, लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें या पत्त्यावर पत्र धाडून आठ दिवसांचे आंत ही मदत मागावी. या जाहिरातीच्या जागा दोन आहेत व त्यांची ही जागा खपल्यास किंमत रु. १०० आहे. ही जागा न खपल्यास पुणें शहर हद्दींतील उत्तम प्रकारच्या उत्पादनास प्रचारार्थ मदत म्हणून ही जाहिरात मोफत देण्यांत येईल. हीं पाकिटें १०,००० आहेत व जागा १॥"×५" मापाची आहे.

म्हैसूर संस्थानचे दिवाण सर मिर्झा इस्माईल यांना कांहीं महिन्याचे पूर्वी अशी विनंति केली होती कीं, येत्या प्रदर्शनामध्यें पुणें शहरवासीयांस सर्व म्हैसूर संस्थान व त्याचे व्यापार, उद्योगधंदे समग्रपणें दाखविण्याची व्यवस्था व्हावी, आणि या विनंतीस म्हैसूर सरकारनें मान्यता दिली आहे. येत्या प्रदर्शनांत म्हैसूर संस्थान आपल्या संस्थानासंबंधीं माहिती बऱ्याच मोठ्या प्रमाणावर स्वतंत्र प्रदर्शन मांडून सर्वांना देण्याची व्यवस्था करणार आहे.

## बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि०

( ता. १८ रोजीं भरलेल्या भागीदारांच्या सभेस डायरेक्टर बोर्डानें सादर केलेला रिपोर्ट )

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटला गेल्या वर्षीं डिपॉझिट्सचे रूपानें जनतेनें सक्रिय सहाय केलें, त्यामुळें सिंडिकेट १९३८-१९३९ च्या मोसमाकरितां ५०० एकर ऊंस लावून तयार करूं शकलें. ह्या साखरेपासून सुमारें ४ लक्ष रुपयांची साखर जानेवारी ते एप्रिल १९३९ ह्या मोसमांत निघेल, आणि सध्याच्या पिकापासून १९३९-४० च्या मोसमासाठी लावण्याकरितां १,२५० एकर उंसासाठीं बियाणेंहि मिळेल. डिपॉझिटची रकम जसजशी जमत गेली, तसतसें सिंडिकेटचें काम सुकर होत गेलें, आणि भाग भांडवल गोळा करण्याचें काम थोडेंफार मंदावण्यांत आलें. तथापि चालू वर्षी पुरेसे भाग भांडवल जमा होईल अशी अपेक्षा आहे.

सिंडिकेटनें खंडानें घेतलेल्या सर्व म्हणजे २,००० एकर जमिनींत ऊंस एकदम लावणें अशक्य होतें आणि १८ हजार रुपये खंड मात्र देणें त्यास आवश्यक होतें. तेव्हां ५½% दरानें मुदतबंद ठेवा घेऊन त्यांचा विनियोग शक्य तेवढी जमीन पिकाखालीं आणण्याकडे करण्याचें धोरण सिंडिकेटनें आखलें. सुमारें ९०० एकरांत लावलेल्या उंसापासून, भुइमुगापासून आणि कपाशीपासून जें उत्पन्न मिळालें, त्याचा खंडाची भरपाई करण्याकडे अंशतः उपयोग झाला आणि जमीनहि तयार झाली.

सिंडिकेटला सरकारकडून हमखास पाणी मिळण्याबाबत करार ता. २२ डिसेंबर, १९३७ रोजीं नोंदण्यांत आला. ऊंस लावण्याकरितां सरकारनें सिंडिकेटसाठीं ८,४६३ एकर, २४ गुंठे जमीन राखून ठेवली असून दरसाल १,२५० एकरांस पाणी देण्याची सरकारनें हमी घेतली आहे. यंत्रसामुग्रीच्या आयातीचे सर्व हप्ते दाखल झाले असून त्यासाठीं स्कोडा कंपनीस किंमत पूर्णपणें देऊन टाकलेली आहे. त्यामुळें सिंडिकेटला १,९५८ रुपये डिस्कौंट मिळून व्याजांत ३,००० रुपयांची बचत झाली.

इमारतींचें बांधकाम आणि मशिनरीची उभारणी हीं संपत आलीं आहेत. जानेवारी, १९३९ अखेर सिंडिकेटची साखर बाजारांत विकत मिळूं शकेल अशी अपेक्षा आहे.

आणखी ३ लक्ष रुपयांच्या भांडवलाचे सहायानें सिंडिकेटला १,२५० एकर ऊंस लावतां येऊन १९३९-४० च्या मोसमांत १२ लक्ष रुपयांची साखर बनवतां येईल. जनतेकडून ही रकम लवकरच जमा होईल, अशी आशा आहे.

### विजेचें उत्पादन

टाटांच्या खोपोली, भिवपुरी आणि भिरा येथील वीज-गृहांत तयार होणारी वीज टाटा हायड्रो, आंध्र व्हॅली आणि टाटा पॉवर ह्या कंपन्यांतर्फे मेसर्स टाटा हायड्रो-इलेक्ट्रिक एजन्सीज लि. ही कंपनी पुरविते. विजेचें खालीलप्रमाणें उत्पादन वाढत आहे, हें सर्वसाधारण आर्थिक प्रगतीचें चिन्ह आहे.

| १ जानेवारी ते १८ नोव्हेंबर | युनिट्स |
|---|---|
| १९३६ | ४८ कोटि, ९६ लक्ष |
| १९३७ | ५७ कोटि, ६९ लक्ष |
| १९३८ | ६५ कोटि, ३९ लक्ष |

## प्रचारक पाहिजे.

पश्चिम खानदेश जिल्हा को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट, धुळें, करितां एक प्रचारक नेमणें आहे. ज्यांनीं मुंबई प्रॉव्हिन्शिअल् को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटच्या सेंट्रल एज्युकेशन बोर्डानें नेमिलेली को-ऑपरेटिव्ह सर्टिफिकेट परिक्षा पास झाली आहे, व जे मुंबई युनिव्हर्सिटीचे पदवीवर आहेत (B. A. with Economics, B. Ag. with Agrl. Economics or B. Com.) अशांनींच फक्त खालील सही करणाराकडे ता. १५ जानेवारी १९३९ चे आंत अर्ज करावे. जर वर उल्लेख केलेल्या दोन्ही लायकीचे उमेदवार मिळाले नाहींत, तर पदवीधरांना नेमण्यांत येईल. जो उमेदवार निवडला जाईल त्याला प्रोबेशनर म्हणून समजण्यांत येईल व त्याची नेमणूक झालेपासून एक वर्षाचें आंत त्यानें को-ऑपरेटिव्ह सर्टिफिकेट परीक्षेस बसून पास झालें पाहिजे. तरच त्यास कायम करण्यांत येईल. निवडलेल्या उमेदवारास कायम होईपर्यंत दरमहा रु. ४० व कायम भत्ता रु. २० ह्याप्रमाणें पगार देण्यांत येईल.

सही डी. जी. पाटील.
चेअरमन.
प. खा. जिल्हा को. इन्स्टिट्यूट
धुळें.

धुळें
ता. १३-१२-३८

द. म. द. शें. ६४ आणे व्याजानें

## कर्जाची नवीन योजना

कर्जखात्याची नवीन योजना लोकप्रिय होऊन अवघे ५ महिन्यांत ३० लोकांस कर्ज देण्यांत आलें आहे. त्यांत २६ लोकांना प्रत्येकीं रु. ५० व ४ लोकांना रु. १०० मिळाले आहेत. कर्ज क्रमवारी अनुक्रमानें देण्यांत येत असल्यामुळें लवकर अर्ज करून लवकर कर्ज मिळवितां येतें.

रु. ७ भरून रु. ५० व रु. १४ भरून १०० व पुढें २०० पासून २००० पर्यंत नियमाप्रमाणें कर्ज दिलें जातें. प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ०२ चीं तिकिटें पाठवा.

दि हिंदुस्थान इंडस्ट्रिअल कंपनी लि.
हेड ऑफिसः-गिरगांव मुंबई, ब्रँचः—लक्ष्मीरोड, पुणें २

# दि गुड-वुइल
# ॲशुअरन्स कंपनी लि.
## पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारांस
भरपूर सवलती माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

## हिंदी पोस्ट आणि तार खात्याचा अहवाल

(१९३७-३८)

हिंदी पोस्ट आणि तार खात्याचा १९३७-३८ सालाविषयक अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यामध्यें खालील माहिती मिळते:-

### पोस्टाचा व्यवहार

अहवालाचे वर्षी पोस्ट खात्यानें एकूण ११९ कोटि पत्रें, पाकिटें इत्यादींची ने-आण केली; ८१½ कोटि रुपयांचा विमा उतरलेल्या बंग्या वाहिल्या, ७६½ कोटि रुपयांच्या मनिऑर्डरी पोंचविल्या आणि २३½ कोटि रुपयांच्या कॅश सर्टिफिकेटांचे पैसे परत दिले.

### नवीन पोस्ट ऑफिसें

वरील मुदतींत १,२४३ नवीं पोस्ट ऑफिसें उघडण्यांत आलीं.

### विमान मार्गे टपाल

ता. २७ फेब्रुवारी, १९३८ रोजीं एंपायर एअरमेल योजना अंमलांत आली, तिच्या अन्वयें ब्रिटिश साम्राज्यांतील देशांतील पहिल्या दर्जाच्या सर्व टपालाची वहातुक विमानांतून होते आणि त्याकरितां जादा टपालखर्च पडत नाहीं. प्रत्येक अर्ध्या औंसाला ७½ आणे मार्गे पडत असत; आतां २½ आण्यांत अर्धा औंस वजनाचें टपाल जातें.

### रेडिओचे परवाने

१९३५-३६ मध्यें रेडिओचे २७ हजार लायसेन्स देण्यांत आले होते. १९३६-३७ मध्यें त्यांची संख्या वाढून ती ४१ हजार झाली आणि १९३७-३८ मध्यें ५४ हजार लायसेन्स देण्यांत आले.

### उत्पन्न-खर्च

पोस्ट आणि टेलिफोन खात्यांच्या नफ्यांत अहवालाचे वर्षी वाढ झाली आणि तार खात्याच्या नुकसानींत घट झाली.

### पोस्ट खातें

पोस्ट खात्यास ७ कोटि, ९४ लक्ष रुपये उत्पन्न झालें; खर्च ७ कोटि ४६ लक्ष रुपये झाला आणि ४८ लक्ष रुपयांची बाकी राहिली. १९३६-३७ मध्यें पोस्ट खात्यास ३०½ लक्ष रुपये नफा झाला होता.

### तार खातें

तार खात्याचें उत्पन्न २ कोटि, ५१½ लक्ष रुपये झालें आणि त्याचा खर्च उत्पन्नापेक्षा १६½ लक्ष रुपये अधिक झाला. टेलिफोन् खात्याच्या उत्पन्नाचे आणि खर्चाचे आकडे अनुक्रमें ९० लक्ष, ३० हजार रुपये आणि ६८ लक्ष, २० हजार रुपये, असे होते.

### रेडिओ

रेडिओ शाखेनेंहि २½ लक्ष रुपयांचें नुकसान दाखविलें. पोस्ट आणि तार खात्याच्या एकूण सर्व व्यवहारांत १९३७-३८ मध्यें जेवढा नफा राहिला, तितका १९३५-३६ नंतर आतांपर्यंत कोणत्याच वर्षी उरला नव्हता. गेल्या वर्षी ५७½ लक्ष रुपये नफा झाला.

### पोस्टल ऑर्डर्स

इंडियन पोस्टल ऑर्डरींची लोकप्रियता वाढत आहे. १९३६-३७ मध्यें १३ लक्ष, १५ हजार रुपयांच्या ५ लक्ष, ९७ हजार पोस्टल ऑर्डरींची देवघेव झाली; १९३७-३८ मध्यें १८ लक्ष, ८२ हजारांच्या ७ लक्ष, ४७ हजारांच्या पोस्टल ऑर्डरींची देवघेव घडून आली.

### सेव्हिंग्ज बँकांतील ठेवी

पोस्टल सेव्हिंग्ज बँकांतील खात्यांवर खातेदारांचे ७७½ कोटि रुपये होते; म्हणजे प्रत्येक खात्याची सरासरी २०४ रु. १० आणे ५ पै इतकी पडली.

### कॅश सर्टिफिकिटें

कॅश सर्टिफिकिटांवरील व्याजाचा दर उतरविल्यामुळें त्यांची विक्री कमी झाली. एकूण १४ कोटि रुपयांचीं कॅश सर्टिफिकिटें खपलीं. हा आंकडा १९३६-३७ मधील विक्रीच्या आकड्याचे मानानें ६८ लक्षांनीं लहान आहे.

### "बेपत्ता" पत्रें

कलकत्ता, मुंबई आणि मद्रास हेड लेटर ऑफिसेसचे हद्दींत दररोज सरासरीनें १०० पत्रें त्यांवर पत्ता न लिहितां टपालाचे पेट्यांत टाकलेलीं आढळलीं.

---

## हातमागाच्या शिक्षणाची सरकारी शाळा

### प्रो. काळे यांचें भाषण

पुणें येथें हातमागाच्या धंद्याचें शिक्षण देणारी संस्था "गव्हर्मेंट हँड वीव्हिंग इन्स्टिट्यूट" ह्या नांवानें सरकारनें गेलीं आठ वर्षे चालविली आहे. ह्या शाळेंत यांत्रिक मागांवरील कामाचेंहि सोपपत्तिक व व्यावहारिक शिक्षण देण्यांत येतें. मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालेल्या आणि मराठी फायनल परीक्षेपर्यंत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरितां दोन निरनिराळे वर्ग असून संस्थेंतील शिक्षण मोफत आहे, इतकेंच नव्हे तर कांहीं शिष्यवृत्त्याहि सरकारकडून देण्यांत येतात. ड्रॉइंग, रंग देणें इत्यादि विषयांचेंहि शिक्षण देण्याची व्यवस्था अभ्यासक्रमांत केलेली असून तज्ज्ञ आणि लायक शिक्षकांची नेमणूक करण्यांत आली आहे. स्वतः हातमागाचा धंदा कार्यक्षम रीतीनें चालवणें आणि गिरण्यांत काम करणें हे मार्ग ह्या संस्थेंत शिक्षण घेणारांस मोकळे होतात. मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्याच्या विद्यमानें ही इन्स्टिट्यूट अत्यंत उपयुक्त अशी कामगिरी करीत असून त्याची सुधारणा आणि त्याच्या कार्याचा विस्तार होण्याची आवश्यकता आहे. तिकडे डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीजचें लक्ष जाईल अशी आशा आहे.

ह्या इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांचें स्नेहसंमेलन गेल्या रविवारीं प्रो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं यशस्वी रीतीनें पार पडलें. खेळ, गायन, नाटक इत्यादि विविध कार्यक्रमांत विद्यार्थ्यांनीं उत्साहानें भाग घेतला. खेळांतील चढाओढींत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांस अध्यक्षांचे हस्तें पदकें देण्यांत आलीं. प्रो. काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत, हिंदुस्थान देशाचें दारिद्र्य, तें निवारण्याचे उपाय, लहान-मोठे उद्योगधंदे चालवण्याचें महत्त्व, तरुण पिढीनें हस्तव्यवसायाचें शिक्षण घेऊन घरगुती धंदे आणि कारखाने ह्यांमध्यें काम करण्याची आणि त्या मार्गानें स्वतःच्या पोटापाण्याचा आणि देशाच्या आर्थिक उद्धाराचा प्रश्न सोडवावयाचा प्रयत्न करण्याची आवश्यकता, इत्यादि मुद्यांचें विवेचन करून वीव्हिंग इन्स्टिट्यूट सारखी शिक्षण संस्था चालवल्याबद्दल मुंबई सरकारचें अभिनंदन केलें. जपान, जर्मनी इत्यादि देशांचे दाखले देऊन तेथील जनता आणि राज्यकर्ते ह्यांचें औद्योगिक धोरण कोणत्या प्रकारचें आहे ह्याची वक्त्यांनीं सुबोध माहिती दिली आणि यांत्रिक कलेच्या सहायानें लहान-मोठे उद्योगधंदे चालवण्याचें महत्त्व श्रोत्यांच्या मनांवर ठसवलें. हिंदुस्थानांत होणारें कपाशीचें मोठें पीक, हिंदी गिरण्यांत बनणारें कापड, हातमागांच्या धंद्याची सद्यःस्थिति, प्रचलित हिंदी शिक्षण पद्धति, बेकारी इत्यादि मुद्यांचें विवेचन करून हिंदी तरूण पिढीनें करावयाच्या कार्याची रूपरेखा प्रो. काळे ह्यांनीं आखली. मोठे आणि लहान धंदे आणि हस्तव्यवसाय ह्यांस उत्तेजन देण्याचा प्रयत्न सध्या युरोपिअन देशांत आणि आतां हिंदुस्थानांतहि चालला आहे त्याकडे लक्ष वेधून त्यापासून योग्य तो बोध घेण्याची सूचना त्यांनीं केली.

## हिंदुस्थानांत काम करणाऱ्या कांहीं एक्सचेंज बँका

हिंदुस्थानांतील एक्सचेंज बँकांसंबंधीं माहिती खालीं दिली आहे, त्यावरून ह्या बँकांच्या व्यवहाराच्या अवाढव्यतेची कल्पना येईल. एक्सचेंज बँकिंगचे क्षेत्रांत एकहि हिंदी बँक अद्याप यशस्वी झालेली नाहीं, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

### चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया ॲन्ड चायना

१८५३ सालीं ह्या बँकेची स्थापना झाली आणि तिचा व्यवहार हिंदुस्थान, चीन, जपान, सयाम, मलाया, आणि डच ईस्ट इंडीज ह्या देशांत चालतो. तिची ऑस्ट्रेलियांत एकहि शाखा नाहीं. तिच्या एकूण शाखांची संख्या चाळिसाचे वर आहे. १९२७ सालीं पी. ॲन्ड ओ. बँकिंग कॉर्पोरेशनचे व्यवहार ह्या बँकेच्या नियंत्रणाखालीं गेले. चीन आणि जपान ह्यांमधील युद्धामुळें १९३७ सालापासून बँकेस अत्यंत कठीण परिस्थितींत काम करावें लागलें. बँकेचें एकूण खेळतें भांडवल सुमारें ८५ कोटि रुपये आहे.

### ईस्टर्न बँक

१९०९ सालीं ईस्टर्न बँक स्थापन झाली. हिंदुस्थानांत तिच्या मुंबई, कलकत्ता, कराची आणि मद्रास येथें शाखा असून इराक, सिंगापूर आणि कोलंबो येथेंहि तिच्या शाखा आहेत. ह्या बँकेच्या सिंगापूरचे पूर्वेस कोठेंहि शाखा नसल्यामुळें चीन-जपान युद्धाचा तिचे व्यवहारावर प्रतिकूल परिणाम झाला, नाहीं. बँकेचें खेळतें भांडवल १६ कोटि रुपये आहे.

### पी. ॲन्ड ओ. बँकिंग कॉर्पोरेशन

सन १९२७ सालापासून ह्या बँकेचें नियंत्रण चार्टर्ड बँकेकडे आहे. पी. ॲन्ड ओ. बँकिंग कॉर्पोरेशनच्या शाखा मुंबई, कलकत्ता, कालिकत, कोलंबो, कोईमतूर, हॉंगकॉंग, मद्रास, शांघाई, सिंगापूर इत्यादि ठिकाणीं आहेत आणि अलाहाबाद बँकेचें चालकत्व तिचेकडेच आहे. चार्टर्ड बँकेचे तीन डायरेक्टर्स आणि चीफ मॅनेजर हे पी. ॲन्ड ओ. बँकिंग कॉर्पोरेशनच्या डायरेक्टर बोर्डावर आहेत. चीन–जपान युद्धामुळें कॉर्पोरेशनच्या शांघाई येथील व्यवहारावर प्रतिकूल परिणाम झालेला आहे. कॉर्पोरेशनचें खेळतें भांडवल २१ कोटि रुपयांवर आहे.

### मर्कंटाइल बँक ऑफ इंडिया

१८५८ सालीं स्थापन झालेल्या चार्टर्ड मर्कंटाईल बँक ऑफ इंडिया, लंडन ॲन्ड चायना ह्या बँकेचा व्यवहार हातीं घेण्यासाठीं वरील बँक १८९२ सालीं अस्तित्वांत आली. बँकेच्या २३ शाखांपैकीं ११ शाखा हिंदुस्थानांत, ब्रह्मदेशांत आणि सिलोनांत आहेत. बँकेचें खेळतें भांडवल २६ कोटि रुपये आहे.

### नॅशनल बँक ऑफ इंडिया

वरील बँकेचा दक्षिण आफ्रिकेंतहि मोठा व्यवहार चालतो. १८६३ सालीं ही बँक कलकत्ता येथें स्थापन होऊन १८६६ मध्यें इंग्लंडमध्यें नोंदली गेली. बँकेच्या एकूण २९ ठिकाणीं शाखा आहेत, त्यांपैकीं ३ युगांडामध्यें, ३ टांगानिकामध्यें आणि ४ केनियामध्यें आहेत. बँकेनें गेलीं तीन वर्षे १८ टक्के दरानें डिव्हिडंड दिलें. त्यापूर्वी अनेक वर्षे तिनें २० टक्के दरानें डिव्हिडंड दिलें होतें.

---

### ज्यू लोकांच्या छळामुळें जर्मन व्यापारांत घट

जर्मनीनें ज्यू लोकांच्या चालविलेल्या छळामुळें त्या देशाविरुद्ध सर्वत्र लोकमत निर्माण झालें आहे, आणि अनेक देशांतील लोकांनीं स्वखुषीनें जर्मन मालावर बहिष्कार घातला आहे.


**Very useful for Central and Urban Co-operative Banks and Societies.**

## " URBAN BANKS "

BY

L. K. BHAGWAT,

*Chief Accountant,*

**Bombay Provincial Co-operative Bank, Ltd.**

The book written in English, besides fully, describing the structure and functions of all types of Urban Banks, supplies practical hints to actual workers on the proper conduct of their day to day business including maintenance of accounts and records, cheques, endorsements, bills, audit, annual closing &c. **Principal Tannan** remarks in his foreword: "The book will show the reader the way to keep the co-operative house in the order expected of it." Price Rs. 2. Postage extra. Copies can be had from L. K. Bhagwat, Vincent Road, Plot No. 168 A, Dadar, Bombay 14.



# CONFIDENCE

**is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its**

## YEARS OF

**Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service**

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

## NEW BUSINESS

**Last year 1936-37**

**Exceeds**

**2 CRORES & 82 LAKHS**

## BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment **Rs. 23** | On Whole Life **Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

## हिंदू पथिकाश्रम

लेखकः—श्री. न. दा. सरपोतदार, सिने आर्टिस्ट, पुणें.

प्रवाशांची उतरण्याची व भोजनाची सोय करणारीं जीं हॉटेलें, ते पथिकाश्रम होत. कांहीं ठिकाणीं अशा हॉटेलांना 'आश्रम'हि म्हटलेलें आहे. उदाहरणार्थ–' सरदार-आश्रम ' ' माधवाश्रम, ' वगैरे. कांहीं ठिकाणीं या हॉटेलांना ' लॉज ' म्हटलेलें आहे. उदाहरणार्थ–' नृसिंह हिंदु लॉज, ' ' गुजराथ लॉज ' वगैरे. कांहीं ठिकाणीं याच हॉटेलांना ' निवास ' म्हटलेलें आहे. उदाहरणार्थ–' आर्य-निवास ' ' सुखनिवास, ' वगैरे. क्वचित् जागीं या हॉटेलांना, 'गृहें'हि म्हटलेलें आहे. उदाहरणार्थ– ' सरदार-गृह ',

एकंदरींत, ' आश्रम ', ' गृह ', ' लॉज ', ' हॉटेल ' व 'निवास' हे सर्व शब्द भोजनाची व रहाण्याची सोय करणाऱ्या हॅाटेल्सनांच लावले जातात व त्यांचा अर्थहि तोच होतो. केवळ भोजनाचीच सोय करणाऱ्या ' खाणावळ ' 'भिशींना' ' बोर्डिंग ' किंवा ' बोर्डिंगहाऊस ' म्हणावें लागतें, म्हणून त्यांना ' भोजनालय ' अगर ' खाणावळ ' असेंच नांव देतात. त्यांचीं उदाहरणें वाचकांसमोर अनेक असल्यामुळें या जागीं मी त्यांचा उल्लेख टाळतो.

हिंदुस्तानांत खाणावळींचा इतिहास ४०।५० वर्षांपूर्वी जात नाहीं, व आश्रमांची माहिती तर तीस वर्षामागेंहि लागत नाहीं. मुंबईच्या सुप्रसिद्ध ' भागवत ' ' सखूबाई ' व ' चंद्रभागाबाई ' वगैरेंच्या खाणावळी चाळीस वर्षांपूर्वीच निघाल्या होत्या. त्यांत सर्वांत जुनी म्हणजे, कै. बाळाभागवत यांची खाणावळ होय. ती इ. सन १८९६ त निघाली होती व ती १९३५ पर्यंत चालली. ' सखूबाई ' व ' चंद्रभागाबाई ' यांच्या खाणावळी भागवतांच्या अगोदरच ५।१० वर्षें चालकांच्या अभावीं बंद पडल्या. कै. धोंडोपंत सावळे यांची खाणावळहि मुंबईत बरीच जुनी होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. होती म्हणण्याचें कारण, आज त्या खाणावळीचें रूपांतर सुप्रसिद्ध ' माधवाश्रम ' ह्या लॉजिंग-बोर्डिंग हाऊसमध्यें झालें आहे. कै. दामुअण्णा वेलणकर ( हॉटेलवाले ) यांचीहि पूर्वी खाणावळच होती म्हणतात; पण प्रस्तुत लेखकाला त्याची पूर्ण माहिती नाहीं.

असो. हल्लीं मुंबईत नाक्यानाक्यानें दिसणारे मोठमोठे गुजराथी आश्रम व लॉज, हे गेल्या दहा-पंधरा वर्षांतलेच आहेत. तोपर्यंत महाराष्ट्रीय खाणावळीच मुंबईत फार प्रसिद्ध असत. त्यांतच, गुजराथी, मद्रासी व बंगाली लोकहि मोठ्या आवडीनें जेवीत असत. आतां मात्र मद्रासी, पंजाबी, गुजराथी व मराठी अशा सर्व प्रांतांच्या खाणावळी मुंबईत दृष्टीस पडतात. चहाचीं हॉटेलें-सुद्धां पूर्वी महाराष्ट्रीय लोकांचींच प्रसिद्ध असत. कै. लक्ष्मणराव गोखले ( ग्रँटरोड, भायखळा व कोट ) व दामुअण्णा वेलणकर ( गिरगांव ) यांचीं हॉटेलें फार लोकप्रिय होतीं. त्यांत त्यांनीं कमाईहि लाखांनीं केली होती म्हणतात ! एकंदर आढावा काढतां, राजापुरापासून दाभोळ-हर्णेपर्यंतचा जो कोंकणचा समुद्र किनारा आहे, त्यांतील ब्राह्मण व बाणकोटी ' रामा ' हेच मुंबईच्या हॉटेलाच्या व खाणावळीच्या धंद्यांत पूर्वी प्रमुखपणें दिसत असत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कोंकणांतील कुळवाड्यांनीं चालविलेल्या पावबिस्किटांच्या बेकऱ्या, व दाभोळ–रेवदंड्याच्या भंडाऱ्यांचीं मटन–शॉप्स हीं पूर्वी बरीच होतीं. ' अर्जुन अंबाजी ' हा पंधरा वर्षांपूर्वी प्रसिद्ध बेकरीवाला होता, व तो जातीनें कुळवाडी होता !

मुंबईचा पहिला हिंदुपथिकाश्रम, ' सुखनिवासच ' असावा. तो १९०४ मध्यें बेनामहॉल लेनच्या नाक्यावर एका दुमजली घरांत पाहिल्याचें मला स्मरतें. त्यानंतरच पुण्याच्या कै. विमूभाऊ साळवेकरांनीं कै. लोकमान्यांच्या प्रोत्साहनानें मुंबईत आपलें ' सरदारगृह ' सिताराम बिल्डिंगमध्यें सुरू केलें. कै. सावळे यांचा " माधवाश्रम " व कै. तात्या देसाई यांचें ' एम्पायर हॉटेल ' हीं सरदारगृहानंतरच निघालीं. गेल्या पांच वर्षांत नविन निघालेला दाक्षिणी पथिकाश्रम म्हणजे, रा. जोशी यांचें ' श्रीकृष्ण बोर्डिंग हाऊस ' होय. यांचेंहि हॉटेल पूर्वी पुण्यालाच होतें. हल्लीं मुंबईत किती तरी लॉज व आश्रम गुजराथी, पंजाबी व मद्रासी लोकांनीं काढलेले आहेत. त्यांतील आर्य पथिकाश्रम, जोशी लॉज, लक्ष्मी विजय लॉज, आर्यनिवास ( गुजराथी ), वेलकम हिंदु हॉटेल ( मद्रासी ), पंजाब हॉटेल, अमृतसर हॉटेल ( पंजाबी ), लंडन हॉटेल व रेल्वे हॉटेल ( कॉसमॉपॉलिटन ) हीं प्रसिद्ध आहेत.

(अपूर्ण)

---

### इजिप्शन उमेदवारांस इंग्लंडमध्यें शिक्षण

ब्लॅकबर्न येथील एका ब्रिटिश कंपनीस एका इजिप्शन कपास कापडाच्या गिरणीकरितां सुमारें १३ लक्ष रुपयांची यंत्रसामुग्री पुरविण्याचें काम मिळालें आहे.ही यंत्रसामुग्री तयार करण्याचे कामीं सहा महिने पर्यंत६०० ब्रिटिश कामगारांस नोकरी मिळेल. ब्लॅकबर्न टेक्निकल कॉलेजांत इजिप्तमधील५४ विद्यार्थ्यांस विणकाम शिकवलें पाहिजे,अशी वरील करारांत एक अट आहे."आपण दरसाल लक्षावधि रुपये संशोधनकार्यावर खर्च करतों. त्याचा फायदा इजिप्शन विद्यार्थ्यांस घेऊं दिल्यास पुढें लँकेशायरच्या मालास घातुक स्पर्धा होऊं लागेल," असें तेथील एका गिरणीवाल्याचें ह्या बाबत म्हणणें आहे."माग बनविण्याचे कामांत आज कांहीं ब्रिटिश कामगारांस नोकरी लागली तरी अखेर पिढ्यान् पिढ्या अनेक ब्रिटिश कामगारांचे पोटावर पाय येईल" असें विणकरांच्या प्रतिनिधींचें मत आहे. ज्या कंपनीस माग तयार करण्याचें काम मिळालें आहे, त्या कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टराचें मत खालीलप्रमाणें आहे:–" गिऱ्हाइकाची इच्छा आम्हीं पूर्ण केली नाहीं, तर गिऱ्हाइक दुसरीकडे जाईल. स्वित्सरलंडमधील कारखानदार इजिप्शन मागणी खुषीनें मान्य करतील. तेव्हां इजिप्तमधील विद्यार्थ्यांस विणकाम शिकविण्याचें आम्हीं पत्करण्यांत अयोग्य असें कांहींच नाहीं."

---

" एका बीजा पोटीं "

" झाडांवर बीं उत्पन्न होतें आणि ह्या बियापासून त्याच जातीचीं नवीं झाडें उगवतात, ह्या गोष्टीचा मनुष्यास आलेला अनुभव क्रांतिकारक स्वरूपाचा होता. वाफेची शक्ती किंवा रेडिओ ह्यांच्यापेक्षाहि अधिक क्रांतिकारक तें ज्ञान ठरलें आहे.

" झाडांस बीं येतें आणि त्यांत उत्पादन शक्ति असते ह्या माहितीमुळें मनुष्य जमिनीस खिळला गेला. त्याचा भटकेपणा बंद पडला आणि रानावनांत हिंडणारा असा प्राणी ह्यापुढें राहिला नाहीं.

" ह्या ज्ञानाचा दीर्घगामी परिणाम मनुष्य जातीवर तात्विक आणि व्यावहारिक दोन्ही रीतींनीं झाला आहे. "

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ... ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% कन्व्हर्शन लोन ( १९४५–५५ ) | ११५–१३ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन | १०१–१४ |
| ४% १९४३ | १०८—३ |
| ३½% बिनमुदत | ९८—१ |
| ३½% १९४७–५० | १०५—२ |
| २¾% १९४८–५२ | ९९—६ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | १११—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२४—४ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% | १४८—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११५—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ३०—४ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% | १५७१—४ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | ११५–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% | १२०—० |
| कराची ( १०० ) ९% | १९०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | १७०–१० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १२९५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १४०५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०३—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% | ९५—८ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९५१—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७४५–१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | १८८—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४१—० |
| सिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | १८—५ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. | ३७—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४३००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २०८–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १६०—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. | ३१३—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै | १५००–० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ७ रु. ८ आ. | १०९—८ |


# दि प्रॉव्हिन्शिअल बँक
## ऑफ अिण्डिया लिमिटेड
स्थापना १९३६

मुख्य कार्यालय:२२ / अ, हॉस्पिटल रोड ( सी. ॲण्ड. अेम् स्टेशन ) बंगळूर

शाखा: मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष: **खानसाहेब हाजी अहमद कासम**, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर: **अेस्. पी. ठाकर.**

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस्**: १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस्**: ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयांपर्यंत कितीहि वेळां पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी**: दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्विकारण्यांत येतात. ह्या संबंधींची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात. सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

**एम्. मोहन, एजंट,** १७ मेनस्ट्रीट, पुणें.

**एच. जी. गद्रे, एजंट** लक्ष्मीरोड, पुणें. २



## ६ टक्के मासिक आंवक ठेव

हॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें ठेव ठेवून फायदा मिळवा.

**जनरल म्यानेजर–हॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.**



## 'अभिनंदनीय प्रगति' असेच बोल नाशिकच्या **सह्याद्रि** विमा

कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.

लिहा अगर भेटा. **मॅनेजिंग डायरेक्टर**



## सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी


यांचे **पेढे व वर्फी** वापरा

**मोती चौक : : : सातारा**

अप-टु-डेट शिलाई करतां

# महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें ] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ स्वाईी भांडाराचे माडीवर




## पराडकर टेलर्स ॲकॅडिमी (६७२ सदाशिव पुणें २)

व

## टेलरिंग फर्म ( सिटी पोस्टासमोर पुणें २ )

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां कापड व सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त तज्ञ पदवीधर व अनुभविक शिक्षकांकडून पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

**पाहिजेत !** बार्शिल मुनसिद्ध विमा कंपनीकरितां महाराष्ट्रांत व कर्नाटकांत कांहीं ऑर्गनायझर व एजन्टस् पगारी कमिशनवर नेमणें आहेत.

# दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

## ( हेड ऑफिस : जळगांव )

माहिती मागवा | चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, लक्ष्मी रोड, पुणें २




## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज ततन ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगां-वर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकाली गर्भपात, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस १ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** ( डि. नं. ६ )
१५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

FOR
**SAFETY, ECONOMY**
AND
**DURABILITY**
Consult

# V. G. & Sons

**ELECTRICAL and RADIO ENGINEERS**
AND
**LICENSED ELECTRICAL CONTRACTORS**
**Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.**

## ☞ फर्म, कंपनी आणि सोसायटी

यांचा प्रचलित कायदा काय आहे यासंबंधीं साताराचे प्रसिद्ध कायदानिपुण वकील श्री. के. वा. गजेंद्रगडकर यांनीं लिहिलेली लेखमाला "**न्यायबोध**" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः सुरू आहे. त्याचप्रमाणें मुंबई हायकोर्टाचे निवाडे व वेळोवेळीं होणारे प्रान्तिक कायदे प्रत्येक अंकांत प्रसिद्ध होतात. फर्म, कंपनी आणि सोसायटी यासंबंधीं येत असलेली श्री. गजेंद्रगडकर यांची लेखमाला मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें मासिक अवश्य संग्रहीं ठेवा. वा.व. ट.ख. सह फक्त ५ रु. नमुना अंकासाठीं सात आण्यांचीं तिकीटें पाठवा.

मॅनेजर,
"**न्यायबोध**" मासिक, नागपूर शहर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.